# पुस्तक प्रकाशनासाठी ई-बुक चांगले माध्यम

**महेश गायकवाड**

**महाकवी स्वा. वि. दा. सावरकर साहित्यनगर, ठाणे :** प्रकाशकाअभावी चांगले साहित्य प्रकाशित होऊ शकत नाही अशासाठी ई-बुक चांगले माध्यम ठरू शकते, असे प्रतिपादन माय विश्व डॉटकॉमचे निर्माते मंदार जोगळेकर यांनी केले.

**मंदार जोगळेकर यांचे मत**

साहित्यनगरीतील जनकवी पी. सावळाराम सभामंडपात 'संवाद तंत्रज्ञानाचा मराठी लेखनकलेवर होणारा परिणाम' या विषयावर परिसंवादाचे आयोजन सोमवारी करण्यात आले होते. यावेळी त्यांनी आपले विचार मांडले. ते म्हणाले की, वेगवेगळ्या भाषेतले शब्द एकत्र येऊन त्यांचे अनुकरण करत ते संवादाच्या रूपाने कळणे महत्त्वाचे आहे. गेल्या तीन ते चार वर्षांत ई-बुकची संकल्पना पुढे आली. नुसता संगणक असून उपयोग नसून त्याच्यावर साहित्य असले पाहिजे. अजूनही चांगले लेखन वाचकांपर्यंत पोहचलेले नाही. ई-बुकच्या माध्यमातून ते पोहचू शकते, असे त्यांनी सांगितले.

तंत्रज्ञानाचा फायदा हा वाचन संस्कृतीला होण्याबरोबर लेखकालाही ई-बुकचा फायदा होऊ शकतो, असेही यावेळी त्यांनी स्पष्ट केले. बदलत्या माध्यमाचा, तंत्रज्ञानाचा फायदा करून घेतला तर वाचन संस्कृतीत वाढ होईल, असे जोगळेकर यांनी सांगितले.